**वेळ : ३ तास** **गुण : १००**

**सूचना : १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**
**३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.**

प्र. १ अ) "साहित्य हे केवळ सामाजिक, सांस्कृतिक कारणांचा परिणाम नसते, तर ते सामाजिक, सांस्कृतिक परिणामांचे कारणही असते", या विधानाची साधकबाधक चर्चा करा. (२०)

**किंवा**

ब) तेनचा 'त्रिमिती सिद्धांत' आणि मार्क्सचा 'पाया व इमला सिद्धांत' यांची सविस्तरपणे चर्चा करा.

प्र. २ अ) महानगरीय साहित्याची पार्श्वभूमी, व्याप्ती आणि महानगरीय साहित्याची वैशिष्ट्ये यांचे विवेचन करा. (२०)

**किंवा**

ब) "क्रमशः ही वेगळ्या आकृतिबंधातून साकारलेली, महानगरातील वेगवेगळ्या वर्गातील पात्रांचे चित्रण करणारी, महानगराचे एक भयान वास्तव रेखाटणारी कादंबरी आहे", या विधानाचा सविस्तर आढावा घ्या.

प्र. ३ अ) ग्रामीण साहित्याचे स्वरूप, वैशिष्ट्ये आणि ग्रामीण साहित्यनिर्मितीच्या प्रेरणा यांचे विस्तृतपणे विवेचन करा. (२०)

**किंवा**

ब) 'धग असतेच आसपास' या कवितासंग्रहातील आशयसूत्रांचा सविस्तर परिचय करून द्या.

प्र. ४ टिपा लिहा. **(कोणत्याही तीन )** (३०)

१) समाज संकल्पनेचे स्वरूप आणि समाजाची लक्षणे
२) मानवतावाद
३) 'क्रमशः' मधील गुन्हेगारीचे चित्रण
४) 'धग असतेच आसपास' मधील बदलते ग्रामीण जीवन
५) मराठी ग्रामीण साहित्याची वाटचाल

प्र. ५ एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही दहा)** (१०)

१) साहित्याच्या कोणत्याही दोन अंगांची नावे लिहा.
२) ललित साहित्याचे प्रमुख प्रकार कोणते?
३) कला आणि साहित्य हे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे, संबंधाचे प्रतिबिंब असते असे कोणी म्हटले आहे?
४) ताराबाई शिंदे यांच्या ग्रंथाचे नाव काय आहे?
५) 'क्रमशः' कादंबरीत उत्तरार्धात कादंबरीतील पात्रे कोणाला पत्र लिहू लागतात?
६) 'क्रमशः' कादंबरी एकूण किती प्रकरणांमध्ये विभागलेली आहे?
७) महानगरीय जीवनाचे चित्रण प्रथम कोणाच्या कवितेतून आले आहे?
८) मराठी नवकथेचा उदय कधी झाला?
९) 'धग असतेच आसपास' हा काव्यसंग्रह कोणी प्रकाशित केला आहे?
१०) 'धग असतेच आसपास'मधील 'अधांतर' कवितेतील कवितागत स्त्रीमन कशाविषयी सहसंवेदन व्यक्त करते?
११) 'माणदेशी माणसं' या पुस्तकाच्या लेखकाचे नाव काय आहे?
१२) 'पाचोळा' ही ग्रामीण कादंबरी कोणी लिहिली?

**********************



XSAGARDADMINY1B2974XSAGARDADMINY1B2974